

- शाळेशी निगडीत विविध शासकीय योजनांची सुयोग्य अंमलबजावणी करणे.
- शाळेला प्राप्त अनुदान वा निधी यांची माहिती करून घेऊन सुयोग्य विनियोग करणे.
- शाळेचा वार्षिक जमाखर्च तयार करून लेखे तयार करण्याची व्यवस्था करणे.
- शाळेत पुरेशी शिक्षकसंख्या आहे, शाळेतील शिक्षक खाजगी शिकवण्या घेत नाहीत, तसेच नियमित वेळेवर शाळेत येतात व शालेय कामकाज लक्षपूर्वक पार पाडतात याची दक्षता घेणे.
- शिक्षकांवर जनगणना व निवडणूका सोडून शिक्षणेतर कामांचा भर पडणार नाही हे सुनिश्चित करणे.



मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे. मुल हे शाळेसोबतच आपल्या शाळेबाहेरील अनुभवातूनही शिकत असते. शिकण्यासाठी असे पूरक अनुभव मिळावेत व मुलांचे शिक्षण आनंददायी व अर्थपूर्ण व्हावे यासाठी शिक्षकांबरोबरच पालक व समाज यांचीही भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. शाळा व्यवस्थापन समिती ही या घटकांची प्रतिनिधी आहे. मुलांच्या शिकण्यासाठी अनुकूल व प्रेरक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी शिक्षक व समाज या दोन्ही घटकांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. शिक्षण प्रक्रीयेतील या भागीदारांना अधिक सक्षम आणि प्रभावी बनविण्याच्या हेतूने ग्यानप्रकाश फाउंडेशन हे महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांमध्ये (नंदुरबार, परभणी आणि जालना) काम करीत आहे.



gyan prakash FOUNDATION

**ग्यानप्रकाश फाउंडेशन**
३०२, 'ऑर्चर्ड' डॉ.पै.मार्ग, बाणेर,
पुणे – ४११०४५
इमेल – admin@gyanprakash.org

# शाळा व्यवस्थापन समिती



भारतातील प्रत्येक बालकास दर्जेदार शिक्षण मिळणे हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. 'शिक्षण हक्क कायदा २००९' च्या अन्वये ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हमी देण्यात आली आहे. मुल चांगले केव्हा शिकेल? जेव्हा त्याच्या शिक्षणासाठी त्याची शाळा, शिक्षक, पालक, व समाज हे सगळे घटक जागरूक असतील व एकत्रित प्रयत्न करतील. याच दृष्टीने शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक शाळेत पालक, शिक्षक, विद्यार्थी व लोकप्रतिनिधी यांचा समावेश असणारी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक केले आहे.



## १. समिती रचना




- प्रत्येक शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे शिक्षण हक्क कायद्यानुसार बंधनकारक.
- ७५% सदस्य बालकांचे माता, पिता किंवा पालक.
- २५% सदस्य स्थानिक प्राधिकरण सदस्य, मुख्याध्यापक किंवा वरिष्ठ शिक्षक, शिक्षणतज्ञ किंवा बालविकास तज्ञ.
- एकूण सदस्यांच्या किमान ५०% सदस्य महिला
- २ विद्यार्थी प्रतिनिधींपैकी किमान १ मुलगी (स्वीकृत सदस्य– मतदानाचा अधिकार नाही.)
- समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पद पालकांतून निवडले जावे व दोन्ही पैकी किमान एक महिला असावी.
- शाळेचे मुख्याध्यापक हे समितीचे पदसिद्ध सचिव असतील.

## २. समिती स्थापना प्रक्रिया



- शाळा व्यवस्थापन समिती स्थापना /पुनर्स्थापना करण्यासाठी मुख्याध्यापकांद्वारा (पदसिद्ध सचिव) पालकसभा आयोजित करावी.
- पालकसभेसाठी किमान ७०% पालकांची उपस्थिती आवश्यक.
- महिलांच्या सहभागासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.
- समितीची रचना, जबाबदारी व कार्य पद्धती यांची माहिती सर्वांना देण्यात यावी.
- शिक्षणाविषयी आवड असलेल्या तसेच शाळेसाठी वेळ देवू शकणाऱ्या उत्साही व कृतीशील पालकांना संधी द्यावी.
- समितीचे गठण राजकीय, सामाजिक दबावाखाली न करता खेळीमेळीच्या वातावरणात लोकशाही पद्धतीने करण्यात यावे.
- समिती सद्स्यांतून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात यावी.
- शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे शाळेत फलकावर दर्शनी भागात नोंदवली जावीत.

## ३. समिती - कार्ये आणि जबाबदाऱ्या (RTE अधिनियमातील कलम २२ नुसार)

- शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक यांनी समन्वयाने शाळा विकासाचे निर्णय घ्यावेत.
- समितीची मासिक बैठक घेणे व तिचे इतिवृत्त सर्व पालकांना उपलब्ध करून देणे.
- पटनोंदणीसाठी गावात मुलांचे सर्वेक्षण करणे, शाळाबाह्य, विशेष गरजा असलेली बालके, मुली, व दुर्बल घटकांतील मुले यांचा शोध घेवून त्यांना शाळेत दाखल करून घेणे.
- विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा नियमित आढावा घेणे, गुणवत्तावाढीस प्रोत्साहन देणे व संबंधित अडचणींचे निरसन करणे.
- शालेय उपक्रम व अध्ययन प्रक्रियेमध्ये सहभाग घेणे.
- शाळेच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख करणे.
- विद्यार्थी शाळेमध्ये शारीरिक व मानसिकरित्या सुरक्षित आहेत हे बघणे.
- शालेय पोषण आहाराची नियमितता आणि दर्जा राखणे.
- शालेय मंत्रीमंडळ/ बालपंचायतीद्वारे बालकांचा सहभाग वाढविणे.
- सर्व सदस्यांच्या सहभागातून शाळा विकास आराखडा तयार करून तो अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने मुख्याध्यापकांमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेस सादर करणे.

**१०० % पटनोंदणी | १००% उपस्थिती | १०० % गुणवत्ता**